IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# आधुनिक संस्कृत नाटककार डॉ. रमा चौधरी यांच्या नाटकातील स्त्री-चित्रण

**प्रा. झीनत शौकत मुलाणी**
सहाय्यक प्राध्यापक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*आधुनिक संस्कृत*
*नाटककार*
*स्त्री*

**ABSTRACT**

संस्कृत साहित्यात कवींप्रमाणेच कवयित्रींचीही एक प्रदीर्घ परंपरा आहे. प्राचीन काळापासून स्त्रिया गद्य, पद्य, चम्पू, नाटय अशा विविध साहित्यप्रकारात आपले योगदान देत आल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. रमा चौधरी यांच्या नाटकातील स्त्री-चित्रणाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या नाटकातून दर्शविलेल्या स्त्री-व्यक्तिरेखा पारंपारिक, सोशिक व केवळ चूल व मुल इतकेच मर्यादित न राहता स्त्रीचे स्वतःचे अस्तित्त्व, विचारस्वातंत्र्य, नेतृत्त्वगुण व निर्णयक्षमता यांचे प्रतीक म्हणून समोर येतात. स्त्रियांच्या अंतर्मनातील भावनिक संघर्ष, समाजाने लादलेली बंधने आणि स्त्रीचा आत्मसन्मान यांचे वास्तववादी चित्रण हे डॉ. रमा चौधरी यांच्या नाट्यलेखनाची वैशिष्टे आहेत. त्यांनी स्त्रीला सामाजिक परिवर्तनाची सक्रिय वाहक मानून आधुनिक संस्कृत नाट्यपरंपरेला नवचेतना देण्याचे काम केले आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Mulani, Z. S. (2025). आधुनिक संस्कृत नाटककार डॉ. रमा चौधरी यांच्या नाटकातील स्त्री-चित्रण. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(VI), 2585–2588.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी विषयानुरूप वर्णनात्मक व विवेचनात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :-**

संस्कृत ही भारताची प्राचीन व प्रतिष्ठित भाषा असून तिचा साहित्यिक प्रवास हजारो वर्षांचा आहे. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, काव्य, नाटक, आयुर्वेद, तत्त्वज्ञान व विज्ञान अशा विविध क्षेत्रात संस्कृतने कालातीत अशी समृद्ध परंपरा निर्माण केली आहे. या साहित्यनिर्मितीत केवळ पुरुषांचेच नव्हे तर स्त्रियांचे योगदानही अत्यंत महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत स्त्रिया संस्कृत भाषेच्या विकासात, संवर्धनात व साहित्यनिर्मितीत सक्रिय राहिल्या आहेत. वैदिक काळात घोषा, अपाला, विश्ववारा, लोपामुद्रा, कात्यायनी; बौद्ध काळात उत्पलवर्णा, वशिष्टी, आम्रपाली; तर लौकिक संस्कृत साहित्यात मारूला, शिलाभट्टारिका, अवंतिसुंदरी, गंगादेवी, वैजयंती इत्यादी कवयित्रींचा उल्लेख आढळतो.

आधुनिक संस्कृत महिला रचनाकारांमध्ये शारदादेवी, श्रीमती लीलाराव दयाल, श्रीमती कमलारत्नम्, डॉ. वनमाला भवालकर, मालती शर्मा, डॉ. रत्नमयी दिक्षित, डॉ. रमा चौधरी, डॉ. मिथिलेश कुमारी मिश्रा, डॉ. कल्पना जोशी, ब्रहमचारिणी बेलादेवी, डॉ. उषा जोशी, डॉ. शशिप्रभा कुमार इत्यादी असंख्य महिला साहित्यिकांनी संस्कृत साहित्याला नवसंजीवनी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**डॉ. रमा चौधरी :-**

आधुनिक संस्कृत साहित्यात डॉ. रमा चौधरी यांचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म ८ फेब्रुवारी १९१२ साली कलकत्ता येथे झाला. त्यांच्या आईचे नाव रोमोला व वडिलांचे नाव सुधांशु मोहन बोस असे होते. त्यांचे आजोबा आनंदमोहन बोस, वडील सुधांशु बोस व काका जगदीशचंद्र बोस हे त्या काळातील उच्च कोटीचे विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. त्यामुळे डॉ. रमा चौधरी यांचे बालपण विद्वत्तापूर्ण व सुसंस्कृत वातावरणात घडले.

रमा चौधरी यांनी कलकत्ता विद्यापीठातून एम.ए ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी निंबार्क दर्शन या विषयावर लंडनमधील ऑक्सफर्ड विद्यापीठातून डी.फिल पदवी मिळवली. ही पदवी प्राप्त करणाऱ्या त्या त्या विद्यापीठातील पहिल्या भारतीय महिला ठरल्या. प्रारंभी त्यांनी संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका म्हणून, त्यानंतर प्राचार्या म्हणून कार्य केले. १९६९ साली त्यांनी रवींद्र भारती विद्यापीठाच्या उपकुलपती पदाची जबाबदारी स्वीकारली.

रमा चौधरी यांचे पती बंगालमधील सुप्रसिद्ध विद्वान तसेच आधुनिक संस्कृत साहित्याचे प्रतिष्ठित कवी व नाटककार होते. १९४३ साली पतीच्या सहकार्याने त्यांनी 'प्राच्यवाणी' या कलकत्ता संस्कृत संशोधन संस्थेची स्थापना केली. रमा चौधरी यांना संस्कृत लेखनाची प्रेरणा व दिशा पतीकडून लाभली. रमा चौधरी ह्या बहुमुखी प्रतिभेच्या धनी होत्या. आधुनिक संस्कृत साहित्यनिर्मितीत त्यांचे महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. त्यांनी इंग्रजी भाषेत ८ ग्रंथ, संस्कृत भाषेत २५ नाटके तसेच बंगाली भाषेतही असंख्य ग्रंथांची रचना केली. त्यांच्या लेखनात परंपरा व आधुनिकता यांचा सुंदर समन्वय आढळतो. त्यांच्या लेखनाचा मुख्य केंद्रबिंदू मानवजीवन विशेषतः स्त्री जीवन, सामाजिक वास्तव आणि नैतिक मूल्ये हा आहे. आधुनिक संस्कृत साहित्यामध्ये स्त्री ही केवळ सहनशील व

त्यागाची मूर्ती न राहता विचारशील, सामाजिक जाणीव असलेली व्यक्ती म्हणून समोर येते. आणि याच बदललेल्या स्त्री जीवनाचे प्रभावी प्रतिनिधित्व रमा चौधरी यांनी आपल्या काही नाटकांमधून केलेले आहे.

**१) निवेदित-निवेदितम् :-**

हे एक नायिका प्रधान ऐतिहासिक स्वरूपाचे नाटक आहे. नायिका निवेदिता (मार्गारेट) ही एक अँग्लो परदेशी स्त्री आहेत. स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी प्रभावित होऊन ती भारतात येते व आपले संपूर्ण जीवन भारतभूमीस समर्पित करते. भारतीय संस्कृती, धर्म, परंपरा आणि जीवनमूल्ये यांचा तिने मनापासून स्वीकार केला. स्त्रीशिक्षण प्रसाराचे कार्य, सामाजिक सेवा, दुष्काळ व प्लेगसारख्या आपतींच्या वेळी तिचे सेवाभावी कार्य, तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देऊन त्यांनी भारतीयांच्या मनात राष्ट्रीय चेतना निर्माण करण्याचे काम केले. एकंदरीतच निवेदित-निवेदितम् या नाटकात नायिका निवेदिता यांची गुरुभक्ती, भारत देशाप्रती असणारे प्रेम आणि जनसेवा ही गुणवैशिष्ट्ये विशेषत्वाने प्रकट करण्याचा प्रयत्न डॉ. रमा चौधरी यांनी केला आहे.

**२) संसारामृतम :-**

प्रस्तुत नाटकात एका दरिद्री केली कुटुंबातील मुलीला मयूर नावाचा मुलगा प्रेमात पाडून तिची फसवणूक करतो. कालांतराने त्याच्या सोबतच तिचा विवाह होतो. पतीच्या अति श्रीमंती व काही चारित्रिक दुर्गुणांमुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनात सदैव संकटे येत असतात. अशावेळी लेखिकेने चित्रित केलेली नायिका खचून न जाता स्वतःला सावरते. पतीचा अहंकार आणि चुकीच्या वर्तनाला सहनशीलतेने तोंड देते. ती आपल्या संसाराला जबाबदारी नव्हे तर साधना म्हणून स्वीकारते. पतीला व आपल्या भाग्याला दोष न देता प्रेम, आपुलकी, सेवा आणि समजूतीने त्याला योग्य मार्गावर आणते व आपल्या बिघडलेल्या संसाराची घडी सुरळीत करते.

**३) देशदिपम् :-**

देशदीपम् या नाटकाची नायिका पंकजनयना ही नायक चम्पकवदन याची बहीण आहे. दोघेही बहीण-भाऊ शिक्षित असून त्यांच्या मनात आपल्या देशाप्रती नितांत आदर व सन्मान आहे. दोघे मिळून ते गावातील स्त्री-पुरुषांना देशसेवा करण्यास प्रेरित करतात. अतुलनीय सौंदर्य, वाक्पटुता, अद्वितीय साहस व देशभक्तीने युक्त पंकजनयना देशसेवेकरिता जखमी सैनिकांची सेवा करण्यासाठी नर्स (परिचारिका) म्हणून रणभूमीवर जाते. यातून तिची करुणा, धैर्य, कर्तव्यनिष्ठा याचा प्रत्यय येतो. कालांतराने आपला भाऊ युद्धात देशसेवेचे कर्तव्य बजावताना शहीद झाल्यानंतर ती आपल्या वैयक्तिक वेदना बाजूला ठेवून कुटुंबाचा आधार बनते. देशासाठी शहीद झालेला चम्पकवदन देशाचा दीप बनला असला तरी त्याग, सेवा, देशप्रेम आणि कुटुंबाची जबाबदारी यांचा संगम पंकजनयना हिच्या व्यक्तिमत्त्वात आहे. हे डॉ. रमा चौधरी यांनी प्रस्तुत देशदिपम् नाटकातून दाखवून दिले आहे.

**४) रसमयरासमणि :-**

हे एक नायिका प्रधान नाटक आहे. प्रस्तुत नाटकात बंगालमधील थोर समाजसेविका राणी रासमणी यांचे जीवनचरित्र चित्रित केले आहे. राणी रासमणी यांचा जन्म एका गरीब परंतु सुसंस्कृत कुटुंबात झाला होता. औपचारिक शिक्षण जास्त नसलेल्या परंतु बुद्धिमत्ता, निरीक्षणशक्ती व व्यवहारज्ञान असलेल्या राणी रासमणींचा विवाह कलकत्यातील प्रतिष्ठित जमीनदार राजा रामचंद्र दास यांच्या सोबत झाला. पतीच्या निधनानंतर त्यांनी जमीनदारीचा कारभार उत्तमरीत्या सांभाळला. न्यायप्रिय व लोककल्याणाची जाणीव असल्याने राणी रासमणी यांनी सामान्य जनतेवर कधीही अन्याय होवू दिला नाही. गरीब, दीन-दलित तसेच विधवा महिलांचा त्या आधार

बनल्या. यात्रेकरूंकरिता धर्मशाला, पाणपोया, रस्ते, घाट, विहिरी अशी अनेक सामाजिक कामे त्यांनी केली. राणी रासमणी यांचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे त्यांनी १८५५ रोजी दक्षिणेश्वरकाली मंदिराची स्थापना केली. हे मंदिर गंगानदीच्या तीरावर असून या मंदिराचे मुख्य पुजारी म्हणून त्यांनी रामकृष्ण परमहंस यांची नियुक्ती केली होती. रामकृष्ण परमहंसांच्या आध्यात्मिक जीवनाच्या विकासात राणी रासमणी यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. १८६१ साली राणी रासमणी यांचे निधन झाले. सामाजिक न्याय, जनकल्याण, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रात प्रभावी नेतृत्वक्षमता इ. गुणवैशिष्ट्यांमुळे राणी रासमणी ह्या स्त्री सामर्थ्याचे आदर्श उदाहरण ठरतात हे डॉ. रमा चौधरी यांच्या रसमयरासमणी या नाटकातून सूचित होते.

**निष्कर्ष :-**

डॉ. रमा चौधरी यांच्या साहित्यामध्ये स्त्रीचे सशक्त, आत्मभानयुक्त व समतावादी रूप स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या स्त्रीविषयक विचारांमुळे आधुनिक संस्कृत साहित्य अधिक समृद्ध झाले आहे. त्यामुळे डॉ. रमा चौधरी यांचे योगदान साहित्यिक तसेच सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. मीरा द्विवेदी, 'आधुनिक संस्कृत महिला नाटककार', परिमल पब्लिकेशन दिल्ली, प्रथम संस्करण 1996
२. डॉ. मंजुलता शर्मा, 'अर्वाचीन संस्कृत साहित्य: दशा एवं दिशा', परिमल पब्लिकेशन दिल्ली, 2004
३. करुणासिन्धु दास, 'संस्कृत साहित्य परिक्रमा', रत्नावली कलकत्ता, 2006
४. डॉ. राजमंगल यादव, 'अर्वाचीन संस्कृत साहित्य', जे.पी.पब्लिशिंग हाउस, दिल्ली, 2015
५. हीरालाल शुक्ल, 'आधुनिक संस्कृत साहित्य', रचना प्रकाशन, इलाहाबाद. 1971

****